<u>नि.दि.मु.क्र.५०/२०१२ मधील नि.२२८ वरील आदेश</u>
**<u>CNR No. MHST16-000253-2012</u>**
<u>**(**अशोक बुवासाो नायकवडी वि**.** भागुबाई मारुती नायकवडी **)**</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादीचा जादा पुरावा 'रद्द' करुन मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे अर्जातील कथन थोडक्यात असे आहे की, वादीतर्फे निशाणी २०४ ला जादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. परंतु वादी हे उलटतपासास हजर राहू शकणार नाही असे वादीचेच निशाणी २२२ चे अर्जामध्ये म्हटले आहे. निशाणी २०४ नुसार वादी हा उलटतपासास हजर नसल्याने वादीचा निशाणी २०४ चा जादा पुरावा रद्द करण्यात यावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. वादीच्या म्हणण्यानुसार तो आजारी असल्याने तो न्यायालयात उपस्थीत राहु शकत नाही. सबब प्रतिवादींचा अर्ज मंजुर करण्यास हरकत नाही.

४. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. सर्व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की वादीने त्याचे जादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक ३०.१.२०२३ रोजी निशाणी २०४ वर दाखल आहे. त्यानंतर वादी हा दिनांक २०.०२.२०२३, ०९.०३.२०२३, २४.३.२०२३,१८.४.२०२३,२८.०६.२०२३,४.०८.२०२३,२४.८.२०२३, २७.९.२०२३,२७.१०.२०२३,१.१२.२०२३,१८.०१.२०२४,३.२.२०२४, २८.०२.२०२४, ०३.०४.२०२४, ०३.०५.२०२४ या तारखांना गैरहजर आहे. वादीने दिनांक १८.०७.२०२४ रोजी पुरावा बंदची पुरशीस दाखल केली आहे. वादीने निशाणी २११ वर त्याचे आजारपणाचे कागदपत्र दाखल केले आहे. तसेच त्याने त्याचे म्हणण्यामध्ये देखील तो आजारी असल्याने प्रतिवादीचा अर्ज मंजुर करण्यास हरकत नसल्याचे म्हटले आहे. वरील सर्व कारणांवरुन वादीचा निशाणी २०४ वरील पुरावा रद्द करणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे. वादीचा निशाणी २०४ वरील जादा पुरावा रद्द करण्यात येत आहे.

ठिकाण - वाई. (सी. व्ही. शिरसाट)
दिनांक - ०९.०८.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.